ARTHA, Poona 4

उद्योगधंदे, बँकिंग,
अर्थशास्त्र, व्यापार,
सहकार, इत्यादी
विषयांस वाहिलेले
प्रमुख मराठी
वृत्तपत्र

स्थापना : १९३५

# अर्थ

*"अर्थ एव प्रधानः" इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति।*
*—कौटिलीय अर्थशास्त्र*

प्रत्येक महिन्याच्या
पहिल्या व तिसऱ्या
बुधवारी
प्रसिद्ध होते.

वार्षिक वर्गणी : ६ रु.

टेलि. ५५६२७

दुर्गाधिवास, पुणे ४

LICENCED TO POST WITHOUT PREPAYMENT
Reg. No. B. 80. Licence No. 175

वर्ष ३१ | पुणे, बुधवार ६ जुलै, १९६६ | अंक १३



SCG-1 HIN

## नहीं —
## यह कोई
## साधारण कार्य नहीं!

# सरदार
## सोडा वाटर
## यंत्रसामग्री

यह यंत्रसामग्री ६० वर्ष पहिले प्रस्तुत की गयी है और आजभी इसकी कोई तुलना नहीं। भारत और पूरबी देशों में हजारों की संख्या में ये यंत्र उपयोगमें हैं और सैनिकी भोजनशाला, क्लब, अस्पताल, उपाहारगृह और खाद्यालय आदि में ये कितने ही यंत्र गत २० वर्षोंसे काम देते आये हैं।

हर दिन ५० से ४०० दर्जनों तक शीतल पेयों की बोतलें निर्माण करनेवाले इन यंत्रों की कीमत का थोडे ही कालमें कई गुना मुबदला मिल जाता है।

हमारे दूसरे निर्माण हैं: १. रंगहीन द्रव कार्बन डायआक्साईड वायु जो कार्बोनेशन में तथा आग बुझाने में उपयोगी है, २. सोडा वाटर यंत्रों के कलपुर्जे, ३. सूखा बरफ

**यंत्रों और कलपुर्जोंकी नकल से सावधान रहिये**



डबल सोडा वाटर यंत्र | घरेलू सोडा वाटर यंत्र

## दि सरदार कार्बोनिक गैस कंपनी लिमिटेड

सर विठ्ठलदास चेम्बर्स, १६, अपोलो स्ट्रीट, बम्बई १.
फोन : कार्यालय : २५३३७१  कारखाना : ७१९०२

### ४ थ्या पंचवार्षिक योजनेसाठी रशियाची मदत

४ थ्या पंचवार्षिक योजनेसाठी भारताला द्यावयाच्या साह्यासंबंधी रशिया आणि भारत ह्यांच्यात वाटाघाटी चालू होत्या. ह्या मदतीचे स्वरूप काय असावे आणि तिची व्याप्ती किती असावी ह्याबाबत उभयता देशांत सर्वसामान्य समजूत पटली आहे. अमेरिका व इतर पाश्चिमात्य देश ह्यांच्याकडूनही भारत मदत मिळविण्याच्या खटपटीत आहे. तथापि, ह्या खटपटीच्या यशापयशावर अगर स्वरूपावर रशियाने आपली मदत अवलंबून ठेवलेली नाही. रशियाकडून मिळावयाच्या मदतीचा तपशील अद्याप ठरला जावयाचा आहे. त्यासंबंधी आणखी बोलणी करावी लागतील. तरीसुद्धा भारताच्या पूर्वीच्या कार्यक्रमांना रशियाने जितकी मदत दिली, तितकी तरी ४ थ्या पंचवार्षिक कार्यक्रमाला रशिआकडून मिळू शकेल अशी लक्षणे दिसत आहेत. बोकॅरो येथे उभारावयाच्या पोलादाच्या कारखान्यासंबंधी काही अडचणी उद्‌भवल्या आहेत. त्यांचे निराकरण करण्यात येऊन हा कारखाना उभा राहिला तर रशिआची मदत आणखीही वाढण्याचा संभव आहे. भारताला मदत करणाऱ्या इतर देशांचे व भारताचे आर्थिक व व्यापारी संबंध कशा प्रकारचे आहेत ह्या विषयी रशिआला साहजिकच उत्सुकता वाटते. पण त्यात नवीन असे काही नाही. पाश्चात्य राष्ट्रांकडून भारतास होणाऱ्या मदतीचा रशियाकडून होणाऱ्या मदतीशी काहीही संबंध नाही, असे सांगण्यात येत आहे. रशिआकडून देण्यात येणारी मदत अगदी वेगळ्या दृष्टिकोनात देण्यात येते. भारताच्या आर्थिक धोरणासंबंधी रशिआने भारत सरकारकडे विचारणा केल्याच्या वार्ता अलीकडे वृत्तपत्रांतून प्रसिद्ध झाल्या होत्या. तथापि अशा प्रकारची विचारणा अगर भारताच्या आर्थिक धोरणासंबंधीचे कसलेच स्पष्टीकरण रशिआने मागितलेले नव्हते, असे आता समजून आले आहे.

### पाकिस्तानचा धूर्त प्रचार

चीनने अणुबाँबचा दुसरा स्फोट केल्यानंतर भारताने अणुबाँब तयार करावा किंवा नाही ह्याविषयी देशात पुन्हा एकदा जोराची चर्चा सुरू झाली. त्याचा फायदा घेण्यासाठी पाकिस्तानने प्रचार चालविला आहे. बऱ्याच आफ्रिकन आणि आशियातील देशांत पाकिस्तानने अशी हूल उठविली आहे की भारत अण्वस्त्रधारी राष्ट्र बनण्याच्या उंबरठ्यावर उभा आहे आणि त्यामुळे त्याच्या शेजाऱ्यांना धोका उत्पन्न झाला आहे. पाकिस्तानचा प्रचार एवढ्यावरच थांबलेला नाही. कॅनडाच्या मदतीने भारत आणखी एक अणुभट्टी उभारणार आहे. ह्या अणुभट्टीचा उपयोग करून भारत अणुबाँबला उपयोगी पडणारे स्फोटक तयार करील अशी भीती पाकिस्तानने कॅनडाकडे व्यक्त केली आहे. भारत अणुभट्टीचा असा उपयोग करणार नाही असे आश्वासनही पाकिस्तानने कॅनडाकडे मागितले आहे.

### शेंगदाण्याची नवीन जात

बिहारच्या शेतीखात्याने शेंगदाण्याची एक नवीन जात शोधून काढली आहे. तिचे पीक तीन महिन्यांत तयार होऊ शकते. जून महिन्याच्या दुसऱ्या अर्धात पाऊस झाल्यावर अगर पाटाच्या पाण्यावर त्याची पेरणी केल्यास ऑक्टोबर महिन्याच्या पहिल्या पंधरवड्यात शेंगदाण्याचे पीक हाती येते. नव्या प्रकारच्या जातीचे दर एकरी पीक १२ मण शेंगा इतके येते. शेंगांचे पीक घेतल्यानंतर गहू, हरबरा, इत्यादी रबी पिके घेण्यास जमीन मोकळी होते.


सरदारगृह


मुंबईत राहण्याची व भोजनाची उत्तम सोय.
मंगलकार्ये व मेजवान्या यांसाठी सोईस्कर ठिकाण.

— आमची वैशिष्ट्ये —

* हीरकोत्सवानिमित्त अद्ययावत पद्धतीचे भोजनगृह व अनेक प्रकारच्या सुखसोयी.
* टिळक जन्म-शताब्दीदिनी लोकमान्यांचे सरदारगृहात केलेले स्मारक

फोन नं. :-३८३३७] सरदारगृह प्रा. लि. [ तार-सरदारगृह
क्रॉफर्ड मार्केटजवळ, मुंबई २.

महाराष्ट्र सरकारने
तगाईवर मंजूर केलेले
"विजय" नांगर
वापरा. ४, ६ व ८ बैली
फाळ व सुटे भाग




तसेच विजय सेंट्रिफ्युगल पंप्स्




१" ते ४" बेल्ट
ड्राइव्ह व
डायरेक्टर
कपल्ड, शिवाय
बोअरिंगचे हँड पंप्स्, हँड रहाट, इ. इ.

— न्यू विजय इंडस्ट्रीज लि. —
विश्रामबाग — सांगली ( महाराष्ट्र )

BUT FOR KEY APPLICATION TO MACHINES
Make doubly sure by fitting



GADRE BANDHU
MADHAVNAGAR (S.R.)
INDIA

MANUFACTURERS OF
MACHINE SPARE PARTS & TOOLS

# अर्थ

बुधवार, ६ जुलै, १९६६





संस्थापक :
प्रा. वामन गोविंद काळे
संपादक :
श्रीपाद वामन काळे


## रुपयाचे अवमूल्यन म्हणजे आर्थिक चुकांचे प्रायश्चित्त

म्हैसूर चेंबर ऑफ कॉमर्स ह्या संघटनेच्या सुवर्णमहोत्सवाच्या प्रसंगी भाषण करताना रिझर्व्ह बँकेचे माजी गव्हर्नर श्री. एच. व्ही. आर. अय्यंगार ह्यांनी रुपयाच्या अवमूल्यनाची कारण-मीमांसा सांगितली आहे. ते आपल्या भाषणात म्हणाले, की सरकारने आर्थिक व द्रव्यविषयक बाबतीत कडक शिस्त पाळ-ण्याची वचने दिलेली होती. ती सरकारला पाळता आली नाहीत आणि शिवाय आर्थिक व्यवहाराची यंत्रणाही सरकारला कार्य-क्षमतेने वापरता आली नाही. त्यामुळे रुपयाचे अवमूल्यन करण्याचा मार्ग स्वीकारावा लागला. अवमूल्यनाचा उपाय हा शस्त्रक्रियेसारखा जालीम आहे. एकदा त्याचा स्वीकार करण्यात आला म्हणजे पुन्हा माघार घेण्याची शक्यताच शिल्लक राहात नाही. अवमूल्यन तर आता करण्यात आलेलेच आहे. त्याची आता मागून चिरफाड करण्यात अर्थ नाही असे नाही. हिंदची अर्थव्यवस्था ज्यामुळे संकटात आली त्या परिस्थितीची कल्पना येण्यास अशा पश्चात चिकित्सेचा उपयोग होऊ शकेल. ह्या विषयासंबंधीचा थोडा इतिहास पाहिला पाहिजे. १९६२ सालच्या ऑक्टोबर महिन्यात भारतावर चीनने आक्रमण केले. तोपर्यंत भारताची अर्थव्यवस्था सुरळीतपणाने चालली होती, हे लक्षात घ्यावयास पाहिजे. त्या वेळी १९५२–५३ च्या किमती १०० धरून घाऊक किमतींचा निर्देशांक १२५ पर्यंत वाढलेला होता. तोपर्यंतच्या १०वर्षांत वस्तूंच्या किमती अवघ्या एक चतुर्थांशानेच वाढलेल्या होत्या. सरकारने तुटीच्या अर्थकारणाचा आश्रय घेऊन विकासाच्या खर्चाची तोंडमिळवणी करण्याचे धोरण स्वीकारले होते, ही गोष्ट लक्षात घेता ही वाढ फार होती असे म्हणता यावयाचे नाही. ह्या धोरणाचे परिणाम तोपर्यंत फारसे जाणवले नाहीत.

चीनच्या आक्रमणानंतर मात्र घाऊक किमतींचा निर्देशांक झपाट्याने १८३ पर्यंत वाढला. त्याचा परिणाम होऊन भारताच्या चढ्या किमतीच्या मालाला आंतरराष्ट्रीय बाजारपेठेत गिऱ्हाईक मिळणे अशक्य होत गेले. ही परिस्थिती उद्भवण्यास दोन कारणे झाली. एक तर देशाचा संरक्षणावरील खर्च एकदम तिपटीने वाढला आणि त्याच वेळी विकासाच्या कार्यक्रमावरील खर्चावर निर्बंध मात्र घालण्यात आले नाहीत. ह्याचा थोडक्यात अर्थ असा की, भारत आपल्या उत्पन्नाचा विचार न करता पैसा खर्च करीत राहिला. भारतामधील दारिद्र्याचे उच्चाटन करण्या-साठी विकासकार्यक्रमाची तातडीने गरज होती ह्यात शंकाच नाही. परंतु तरीसुद्धा हे कार्यक्रम अमलात आणताना वस्तु-स्थितीची दखल घेऊन समतोलपणा राखण्याची आवश्यकता होती. प्राथमिक अवस्थेत काही मर्यादेपर्यंत तुटीच्या अर्थ-कारणाचा अवलंब करण्याशिवाय इलाजच नव्हता. परंतु हा इलाज धोकादायक होता आणि त्याचा योग्य वापर करता न आल्यास तो स्वतःच्या गर्तेने जाण्याची शक्यता होती, हे ओळखावयास पाहिजे होते. अर्थव्यवस्थेत सध्या जो विस्कळीत-पणा दिसून येतो तो खर्च कमी करण्याची गरज लक्षात न घेण्याच्या राजकीय चुकीचा परिणाम आहे. आता करण्यात आलेल्या अवमूल्यनामुळे किमती अधिकच भडकण्याची शक्यता नजरेआड करून चालणार नाही. मूलभूत गरजांच्या वस्तूंच्या किमती केवळ वटहुकूम काढून अगर ग्राहक वस्तु-भांडारांची स्थापना करून स्थिर राखता येतील असे मानणे व्यर्थ आहे. उद्योगधंद्यांपुरते बोलावयाचे तर प्रचंड प्रमाणावर परकीय मदत मिळविता आली तरच अवमूल्यनाला अर्थ आहे. कारण, मदतीचा उपयोग करून जरूर तो कच्चा माल व यंत्रांचे सुटे भाग आयात करणे तरच शक्य होईल. अवमूल्यन हा गतकालात केलेल्या चुकांचा परिणाम असला तरी त्यामुळे अर्थ-व्यवस्था निरोगी होईलच अशी खातरजमा देता येत नाही.

---

## रुपयाचे अवमूल्यन आणि शेतमालाचे उत्पादन

म्हैसूर चेंबर ऑफ कॉमर्स ह्या संघटनेने शेतमालाच्या उत्पादनासंबंधी दोन दिवसांचा एक परिसंवाद योजला होता. ह्या परिसंवादात भाग घेताना नियोजन समितीचे सभासद डॉ. व्ही. के. आर. व्ही. राव म्हणाले की रुपयाचे अवमूल्यन करण्यात आल्यामुळे अन्नपदार्थांच्या किमतीत होणाऱ्या वाढीपैकी काही वाढ सरकारने आर्थिक मदत देऊन सोसण्याचा उपाय हा कायम स्वरूपाचा नाही. तात्कालिक उपाय म्हणून त्याचा अवलंब करावयास हरकत नाही. निर्यात वाढावी आणि आयात कमी व्हावी असा अवमूल्यन करण्याचा उद्देश आहे. परंतु अवमूल्यनानेच फक्त हा उद्देश साध्य होण्यासारखा नाही. अधिक माल निर्यात करावयाचा म्हणजे त्याचे उत्पादन वाढविणे ओघानेच आले, आणि हाच निर्यातवाढीचा खरा उपाय आहे. उत्पादनवाढ साधणे हे काम झपाट्याने जमण्या-सारखे नसल्यामुळे देशांतर्गत खपावर निर्बंध घातले जाण्याचीही शक्यता आहे. अवमूल्यनाचा उपाय हा जालीम आहे. पर-देशांतून करण्यात येणारी अन्नधान्याची आयात जर पूर्णपणे थांबली नाही तर हा उपाय म्हणजे एक क्रूर चेष्टाच ठरण्याचा संभव आहे. अन्नधान्याचे उत्पादन वाढविण्यासाठी उत्पादनाच्या जुन्या पद्धती टाकून नवीन तंत्रांची आणि कल्पनांची कास धरणे आवश्यक आहे. अन्नधान्याच्या बाबतीत जी गोष्ट खरी आहे तीच इतर शेतमालाच्या बाबतीतही खरी आहे. अन्न-धान्याच्या उत्पादनाला मदत करण्याच्या नावाखाली उद्योग-पतींनी मोठमोठी शेती आपल्या कबजाखाली आणता कामा नये. उद्योगपतींनी स्वतः शेतकरी बनण्याचे कारण नाही. शेतकऱ्यांना आधुनिक पद्धतीची शेतीची अवजारे आणि इतर उपयुक्त साहित्य पुरविण्याचे काम त्यांनी करावे. शेतकऱ्याला अशा प्रकारचे साहाय्य करण्यात आल्यास देशातील शेतीचा कायापालट करणे अशक्य नाही.

---

## " कंट्रोल रूम नोटा छापणाऱ्या छापखान्यात हवी "

—डॉ. बी. आर. शेणॉय

" युरोपातील बाजारात रुपयाची किंमत अजूनही अधिकृत किमतीच्या कितीतरी खाली आहे; एका रुपयाला ११·४३ पेन्स मिळायला हवेत, पण फक्त ८ पेन्सच मिळू शकतात. अधिकृत दर आणि खुल्या बाजारातील दर ह्यांमधील तफावतीमुळे परदेशी हुंडणावळीचा काळा बाजार चालूच राहणार आहे. चलनवाढीमुळे रुपयाची खरी किंमत गेली २० वर्षे ढासळत चाललेली आहे. त्यामुळे त्याच उत्पादनाच्या निर्गतीला कमी कमी मोबदला परदेशांत मिळतो. गेली २० वर्षे सामान्य नागरिकांवर अन्याय होत आला आहे; आज ३०० रुपयांची दरमहा प्राप्ती असणाऱ्यालाही दूध घेणे परवडत नाही; अशी परिस्थिती आहे. सरकारी धोरणामुळे खरा फायदा श्रीमंतांनाच होत आहे. उद्योगपती, विशेषतः आयात करणारे व्यापारी, ह्यांची सामान्य माणसाच्या जिवावर चंगळ चालली आहे. आयातीचे लायसेन्स विकून ४६० कोटी रुपये त्यांनी राष्ट्रीय उत्पन्नांतून हिरावून घेतले आहेत; भर मात्र एका पैशाचीही घातलेली नाही. नायलॉनच्या उत्पादनाला सरकारचे प्रोत्साहन मिळते; वास्तविक इतर कापडाच्या स्वस्त उत्पादनाकडे त्याचे खरे लक्ष असायला हवे. किंमतवाढ रोखून धरण्यासाठी दिल्लीस एक " कंट्रोल रूम " स्थापन करण्याचा सरकारचा विचार आहे; ती वास्तविक सरकारसाठी चलनी नोटा छापणाऱ्या नाशिक येथील सिक्युरिटी प्रेसमध्ये हवी. "

### फ्रान्सची अण्वस्त्राच्या स्फोटाची तयारी

फ्रान्स स्वतःच्या अण्वस्त्राची चाचणी करण्याची तयारी करीत आहे. चाचणी दक्षिण पॅसिफिक महासागरातील टाहिटी ह्या द्वीपसमूहात करण्यात येणार असल्याने ह्या भागात हजारो कामगार, सैनिक आणि अणुतंत्रज्ञ ह्यांचा ओघ सुरू झाला आहे. टाहिटी येथील बंदराचा विस्तार करण्यात येऊन ते आधुनिक सोयींनी सुसज्ज करण्यात येत आहे. एक मोठा विमानतळही उभारण्यात येत आहे. ह्या सगळ्याचा परिणाम म्हणून जमिनीच्या किमती एकसारख्या उंचावत चालल्या आहेत. अल्जिरिया फ्रान्सपासून स्वतंत्र झाल्यावर तेथील अनेक फ्रेंच सैनिक परागंदा झाले. ह्या सैनिकांची एक तुकडीच टाहिटी बेटात वसाहत करून राहिली आहे. दक्षिण पॅसिफिकमधील ही बेटे ओसाड आहेत. तेथे बांधकामासाठी लागणारे काहीही साहित्य मिळू शकत नाही. त्यामुळे फ्रान्सला सर्व प्रकारची साधनसामग्री १७ हजार किलोमीटर अंतर वाहून आणावी लागली.

### अपंग सैनिकांच्या पुनर्वसनासाठी बँक

इंडियन एक्स–सर्व्हिसमेन्स लीगचे अध्यक्ष, जनरल करिअप्पा, ह्यांनी अपंग झालेल्या सैनिकांच्या पुनर्वसनाला आर्थिक हातभार लावण्यासाठी एक बँक स्थापन करण्यात यावी, अशी सूचना केली आहे. युद्धात मृत्यू पावलेल्यांच्या कुटुंबियांसाठी घरे बांधण्यास मदत करणे आणि त्यांच्या अनाथ मुलामुलींच्या शिक्षणास सहाय्य करणे, ह्याकामीही बँक उपयुक्त कार्य करू शकेल. राज्य सरकाराजवळ युद्धोत्तर पुनर्घटना फंड आहेत, त्यांतून काही रकम त्यांनी ह्या नियोजित बँकेस द्यावी, असेही जनरल करिअप्पांनी सुचविले आहे. ही बँक लीगच्या नियंत्रणाखाली राहील. युद्ध चालू असताना परमेश्वराची आणि सैनिकांची आठवण होते, पण ती जिंकल्यावर सर्वांआधी त्यांचाच विसर पडतो, असेही ते म्हणाले.

### अमेरिकेच्या गव्हाच्या उत्पादनात घट

अमेरिकेतील गहू पिकविणाऱ्या भागात खराब हवामान पडल्याने शेतीखात्याने गव्हाच्या उत्पादनाचा अंदाज ११·५ कोटी बुशेल्सनी कमी धरला आहे. गेल्या वर्षाच्या उत्पादनाच्या मानाने हा अंदाज ११ टक्क्यांनी कमी आहे. शेतीसंबंधीचे आकडे जमा करणाऱ्या काही खाजगी अमेरिकन संघटनांच्या मताने गव्हाचे पीक ८·२ कोटी ते १० कोटी बुशेल्स इतकेच कमी येईल. गेल्या वर्षाच्या मानाने चालू वर्षी ४·५ कोटी बुशेल्स गहू अधिक पिकेल असा अंदाज शेतीखात्याने प्रथम केला होता. परंतु खराब हवा पडल्यानंतर केलेला अंदाज खरा ठरला तर गेल्या वर्षापेक्षा अमेरिकेतील गव्हाचे उत्पादन ९·२ कोटी बुशेल्स कमी होईल. अमेरिकेतील गव्हाचे उत्पादन घटण्याची व त्यामुळे शिलकी साठा खूप कमी होण्याची शक्यता असल्यामुळे काही व्यापारी गट गव्हाच्या निर्यातीवर बंधने घालावी असे म्हणू लागले आहेत.

### सूक्ष्म मापन करणारी उपकरणे व हत्यारे

भारत सरकारने नागपूर येथे सूक्ष्म मापन करणारी उपकरणे व हत्यारे तयार करण्याचा एक कारखाना काढण्याचे ठरविले आहे. ह्या कारखान्यासाठी १ कोटी रुपये खर्च येणार आहे. कारखाना उभारण्याचा परवाना एका खाजगी कंपनीला देण्यात आला असून कंपनीचे प्रमुख युरोपमधील कारखान्यांचे सहकार्य मिळविण्यासाठी लवकरच तिकडे जात आहेत. भारतात अशा प्रकारची सूक्ष्म उपकरणे करणारे दोनच कारखाने सध्या आहेत. दोन्ही कारखान्यांत मिळून दरसाल १० लाख रुपयांचा माल तयार होतो. तथापि नेहमीच्या वापरात लागणाऱ्या अनेक प्रकारच्या सूक्ष्म उपकरणांची मागणी दरसाल ४·५ कोटी रुपये किमतीची आहे. इतकेच नव्हे, तर ही मागणी वाढत असून १९७० पर्यंत ती ९ कोटी रुपयांपर्यंत पोचेल. संकल्पित कारखान्यात दरसाल २ कोटी रुपयांचा माल तयार होईल आणि त्यात २०० लोकांना रोजगार मिळेल.

### " इयं जर्मन आकाशवाणी "

कलोन येथील नभोवाणी केंद्रावरून गेल्या फेब्रुवारीपासून दर महिन्याच्या दुसऱ्या गुरुवारी संस्कृत कार्यक्रम ध्वनिक्षेपित करण्यात येत आहे. कार्यक्रमाच्या आरंभी 'इयं जर्मन आकाशवाणी । अधुना अस्माकम् संस्कृत कार्यक्रमः प्रारम्यते' असे सांगण्यात येते. पश्चिम युरोपातील दुसऱ्या कोणत्याही देशातून संस्कृत भाषेतील कार्यक्रम प्रसारित करण्यात येत नाही. ह्या कार्यक्रमात प्राचीन भारतीय संस्कृतीसंबंधीचे कार्यक्रम आणि संस्कृत वाङ्मयासंबंधी जर्मन विद्यापीठात करण्यात येणाऱ्या संशोधनावर आधारित कार्यक्रम असतात. कार्यक्रम श्रोतृगणांना फार आवडतात. कालिदासाच्या शाकुंतल नाटकाचे नभोनाट्य रूपांतर लवकरच रेडिओवरून सादर करण्यात येणार आहे.

### पृथ्वीचे वय किती ?

सोविएत युनियनमधील भूविज्ञानशास्त्रीय संशोधन संस्थेतील शास्त्रज्ञांच्या एका गटाने उरल पर्वतातील विशिष्ट प्रकारच्या खडकाचे वय ४ अब्ज, २० कोटी वर्षे असल्याचे पोटॅशियम–ऑरगॉन–पृथक्करण पद्धतीने शोधून काढले आहे. तत्पूर्वीही दुसऱ्या एका प्रकारच्या खडकाचे वय ३ अब्ज, ८० कोटी वर्षे असल्याचे प्रस्थापित झाले आहे. तेव्हा या उपलब्ध माहितीच्या आधारे, 'पृथ्वी किती वयाची आहे ?' हे शोधून काढता येणे शक्य आहे.

# धुळे जिल्हा सहकारी भू-विकास बँक लि.

## संचालक मंडळाचे चेअरमन आमदार श्री. गजमल तुळशीराम पाटील ऊर्फ बापूजी यांचा परिचय



धुळे जिल्ह्यातील सहकारी चळवळीशी प्रामुख्याने संबंधित असणाऱ्या जुन्या व्यक्तींपैकी आमदार श्री. गजमल तुळशीराम पाटील हे आहेत. त्यांचा सहकारी चळवळीशी अनेक क्षेत्रांतून संबंध आला व तो दीर्घकाळ टिकून त्यांचे व्यक्तिमत्त्वाला प्रगतिकारकच ठरला आहे.

त्यांचा चळवळ्या स्वभाव आरंभापासूनच. सन १९३० सालच्या ब्रिटिश सरकारविरुद्धच्या असहकारितेच्या चळवळीत, विद्यार्थी दशेत अनेक मित्रांबरोबर त्यांनी उडी घेतली होती. परंतु शालेय जीवनातील त्यांचे व्यक्तिमत्त्व चमकले, ते हुशार विद्यार्थी आणि प्रवीण खेळाडू म्हणून.

त्या काळच्या या जिल्ह्यातील फारच थोड्या सुखवस्तू शेतकरी कुटुंबांतील इतर तरुणांप्रमाणेच त्यांनी आपले शालेय शिक्षण पूर्ण केले व सन १९३३ साली सहकारी खात्यातच सरकारी नोकरीने आपल्या आयुष्यक्रमाला सुरुवात केली. सहकारी क्षेत्रातील सरकारी कर्मचारी म्हणून त्यांनी सहकारी चळवळीची वाखाणण्याजोगी सेवा केली. त्या वेळच्या ग्रामीण विभागातील शेतकरी कुटुंबांतील सरकारी क्षेत्रात असलेले तरुण कर्मचारी हेच शेतकऱ्यांचे खरे कैवारी समजले जात. एरवी सरकार अनेक सहकारी व शेतकरी जीवनाच्या उद्धाराच्या चळवळी कागदोपत्री उभारी, परंतु नोकरशाहीवरच त्यांचे यशापयश अवलंबून असे. तत्काळी ग्रामीण विभागातील शेतकरी व नगरवासी बुद्धिजीवी वर्ग अगर नोकरशाही यांमध्ये फारसा संपर्क नव्हता. तसेच त्या काळी कोणत्याही चळवळीचे पुढारी निर्माण करणे सर्वस्वी नोकरशाहीचे हाती असे. त्या मानाने गजमल बापूजी व त्यांच्या बरोबरीच्या सहकारी खात्याच्या निरनिराळ्या विभागांतील मित्र मंडळींनी ग्रामीण भागांतून अनेक पुढाऱ्यांना सहकारी चळवळीत प्रोत्साहन दिले. त्यांपैकी बरेचजण आज सहकारी चळवळीच्या आघाडीवर वावरत आहेत. तसेच त्या काळच्या सरकारी क्षेत्रातील गजमल बापूजींसारख्या अनेक व्यक्तीही आज त्यांचे बरोबरच कार्यकर्ते म्हणून काम करीत आहेत. अशा रीतीने जिल्ह्यातील सहकारी चळवळीला उत्साही वळण लावण्यात त्यांचा प्रामुख्याने हिस्सा आहे.

श्री. गजमल बापूजींचा नंदुरबार तालुक्यातील खोंडामळी हा गाव मोठा वैशिष्ट्यपूर्ण आहे. या गावी मिरचीचे पीक हमखास चांगल्या प्रमाणात येते. मिरची हे शेतकऱ्यांच्या वाट्याला थोडाफार पैसा आणून देणाऱ्या व्यापारी पिकांपैकी एक आहे.

श्री. गजमल बापूजींचे घराणे मूळचे मोठ्या सुखवस्तू शेतकऱ्यांपैकी होते. परंतु लहानसहान नोकरीही त्या काळी मोठे मानाचे प्रलोभन समजले जाई. या कारणास्तव बापूजींनी आपले वडिलांचे हयातीत १५ वर्षे सरकारी नोकरी केली. परंतु स्वातंत्र्यानंतरच्या काळात त्यांनी सरकारी नोकरीचे क्षेत्र सोडून आपली कौटुंबिक जबाबदारी सांभाळली व आपल्या खोंडामळी गावचे सोसायटीचे चेअरमन, ग्रामपंचायतीचे सरपंच, या पदावरून सार्वजनिक जीवनाला प्रारंभ केला. हे क्षेत्र त्यांना भरपूर वाव देणारे ठरले. सन १९४८ सालीच त्यांचे गावास ग्राम सुधारणेबाबतची सर फ्रेडरिक साईक्स ढाल त्यांचे ग्रामसुधारणेचे प्रयत्नामुळे मिळाली.

प्राथमिक सहकारी सोसायटीचे चेअरमन या पदावरून श्री. गजमल बापूजींनी वाटचाल सुरू करून जिल्हा भू-विकास बँकेचे चेअरमनपद व राज्य भू विकास बँकेचे संचालक मंडळाचे सदस्यत्वापर्यंत व राजकीय क्षेत्रात पंचायतीचे सरपंचपदापासून आमदार पदापर्यंत मजल गाठली आहे. काँग्रेसची संघटना ही खेडोपाडी पोहोचवून नंदुरबार तालुका काँग्रेसचे अध्यक्षपदाचीही जबाबदारी त्यांनी दीर्घकाळ सांभाळलेली आहे. तसेच धुळे जिल्हा लोकल बोर्डाचेही ते ५ वर्षे सभासद होते. धुळे जिल्हा सहकारी भू-विकास बँकेचा व्यवहार आज महाराष्ट्र राज्यातील दुसऱ्या कोणत्याही भू विकास बँकेपेक्षा मोठा असून पद्धतशीर ठरला आहे. सरकारच्या अधिक धान्य पिकवा मोहिमेनुसार विहीर व एंजिन तगाईचे वाटपाचे काम या बँकेने यशस्वीरीत्या पार पाडून धन्यवाद मिळविले आहेत. या कामी आमदार बापूजींचे चातुर्य व दप्तरी कामकाजाचा प्रत्यक्ष अनुभव आणि ज्ञान हे उपयुक्त ठरले आहे. राज्य भू-विकास बँकेच्या संचालक मंडळाचे गेली १० वर्षे ते सतत सदस्य असून त्या मंडळाच्या कार्यकारी समितीचे तसेच कर्मचारी समितीचेही ते सभासद आहेत.

श्री. बापूजींचा कौटुंबिक परिवार फारसा मोठा नाही. परंतु खोंडामळी येथील आपल्या वडिलोपार्जित सुमारे ५० एकर जमिनीत कसलेल्या शेतकऱ्याप्रमाणे जातीने लक्ष देऊन मिरची, कंबोडिया कापूस व गहू, बाजरी, इत्यादी पिके भरपूर काढल्याशिवाय त्यांना समाधान वाटत नाही. अशा प्रकारे शेती करीत असताच नंदुरबार तालुक्यातील मोडकळीस आलेली खरेदी-विक्री सोसायटी व तालुका शेतकी विकास मंडळ या दोन्ही संस्थांचे एकत्रीकरण करण्यापूर्वी ते १९५२ साली चेअरमन असतानाच त्यांनी त्या संस्थेच्या मालकीची इमारत बांधून त्या वेळचे महसूल मंत्री पूज्य श्री. भाऊसाहेब हिरे यांचे हस्ते तिचे उद्घाटन घडवून आणले व त्या वेळेपासून आजवर ती संस्था शेतकऱ्यांची प्रगतिशीलपणे सेवा करीत आहे. गेल्या वर्षीच, सन १९६२–६३ साली संस्थेने एक लाख रुपये नफा शेतकऱ्यांचे पदरी पाडून दिला. अशाच अनेक लहान सहान सहकारी संस्थांची रोपटी बापूजींनी लावली आहेत.

त्यांच्या कार्याचा गाभा म्हणजे त्यांचे शेतकऱ्यांवरील प्रेम व शेतकऱ्यांचा त्यांचेबद्दल निर्माण झालेला जिव्हाळा. या दोन्हीही गोष्टी एकमेकांस भरपूर पूरक ठरलेल्या आहेत. म्हणूनच ते अतिशय घडाडीने अल्प काळात अनेक संस्था चालवीत आहेत.

सहकारी शेतकी चळवळीचा परिपोष सुखद न वाटणाऱ्या काही व्यक्तींच्या विरोधातूनही अल्प काळात संस्था उभारून त्या टिकवू शकले. अशाच प्रकारे त्यांनी नंदुरबार तालुका विधायक समिती ही संपूर्णपणे शेतकऱ्यांची संस्था स्थापन करून दोन वर्षांपूर्वी त्या वेळचे उपमंत्री श्री. ना. स. पाटील यांचे शुभहस्ते नंदुरबार येथे यशवंत हायस्कूल व छात्रालय तसेच आदिवासी कन्या छात्रालय उघडले आहे व त्या समितीने चालू वर्षापासूनच नंदुरबार येथे ऑर्ट्स कॉलेज सुरू केले असून त्यात आज २०५ ग्रामीण तसेच आदिवासी विद्यार्थी शिकत आहेत. पुढील वर्षी सायन्स कॉलेज सुरू करण्यासाठी लागणारे भांडवलही या मंडळींनी उभारले आहे. हे भांडवल कोणा धनिकाने केलेल्या वैयक्तिक दानधर्मातून उभे झालेले नाही, तर या विभागातील सहकारी सोसायटया व ग्रामपंचायती यांनी ठराव करून कार्याचे महत्त्व जाणून व त्याचे प्रमाण वैयक्तिक देणगी रूपाने मंजूर केलेल्या, तसेच श्री. गजमल बापूजी व त्यांचे सहकारी मंडळी यांचेवरील प्रेमाने कार्याचे महत्त्व जाणून शेतकरी बंधूनी व्यक्तिशः दिलेल्या देणगीतून जमलेले आहे. श्री. गजमल बापूजी व त्यांच्या सहकाऱ्यांचे कोणत्याही चळवळीला सामर्थ्य आणण्याचे कौशल्य वाखाणण्यासारखे आहे. गेल्या १९६२ सालच्या त्यांच्या आमदार पदाच्या निवडणुकीतही श्री. गजमल बापूजी यांनी मोठ्या चुरशीतूनच दहा हजार अधिक मतांनी भरघोस यश मिळविले.

श्री. गजमल बापूजी यांच्या यशाचे गमक त्यांच्या मनमिळावू व मोकळ्या आणि निस्वार्थी स्वभावात व प्रभावी आणि आकर्षक व्यक्तिमत्वात, तसेच दुर्दम्य उत्साहातच आहे. आज वयाच्या ५३ व्या वर्षीही ते एखाद्या उमद्या तरुणासारखे दिसतात व अहोरात्र झटू शकतात. विशेषतः आपली अथवा आपल्या पक्षाची अथवा सहकाऱ्यांची अगर मित्राची चुरशीची निवडणूक असली म्हणजे बापूजींना अनेक दिवस झोपेचे अगर जेवणाचे भान राहात नाही. निवडणुकांच्या निमित्ताने व ग्रामीण विभागात सहकारी नोकरी निमित्ताने फिरस्ती करीतच जिल्ह्याच्या कान्याकोपऱ्यापर्यंत फारच मोठा मित्र परिवार सार्वजनिक जीवनात पदार्पण करणे पूर्वीच जोडला होता. धुळे जिल्हा सहकारी भू-विकास बँकेचे १२ वर्षे चेअरमन म्हणून व सहा वर्षे लोकलबोर्डाचे अध्यक्ष म्हणून राहिलेले, हल्ली पुणे येथे महाराष्ट्र महसूल खात्याचे न्याय मंडळाचे सदस्य असलेले बॅरिस्टर अप्पासाहेब मोरे हे तर बापूजींच्या या उत्साही स्वभावाची वेळोवेळी तारीफ करतात. अजूनही मी थकलो नाही, ते काम फार कठीण आहे, असे शब्द त्याचे तोंडून निघालेले कधीही कोणाच्या कानी पडलेले नाहीत. आपल्या मित्रपरिवारासाठी आवश्यक ते धाडस व त्याग करण्याची त्यांची नेहमी तयारी असते.

## पाकिस्तानच्या अर्थमंत्र्यांची नाटकी सूचना

पाकिस्तानच्या अर्थमंत्र्यांनी भारत व पाकिस्तान ह्यांनी आपआपल्या संरक्षणखर्चात कपात करावी अशी सूचना केली असून ह्या सूचनेला मंत्र्यांच्या पातळीवर होणाऱ्या उभयतांच्या बैठकीत प्राधान्य देण्यात यावे असेही म्हटले आहे. रशिआच्या एका प्रतिनिधिमंडळाने अलीकडेच पाकिस्तानचा दौरा केला. त्यानंतर ही सूचना करण्यात येत आहे हे अर्थपूर्ण आहे. उभयता देशांतील तेढीचे वातावरण कमी व्हावे म्हणून युद्धबंदी करार करण्याची सूचना भारताने पूर्वीच केलेली आहे. पण, पाकिस्तानने ती न मानता गेल्या वर्षी भारतावर उघडउघड आक्रमण केले. पाकिस्तानने आज केलेली सूचना प्रामाणिकपणाची असेल तर अजूनही युद्धबंदी कराराचा मार्ग मोकळा आहे. भारताच्या संरक्षणखर्चाबाबतची वस्तुस्थिति लक्षात घेण्यासारखी आहे. १९६० सालापर्यंत भारताचा संरक्षणखर्च ३०० कोटी रुपयांच्या जवळपास होता. त्याउलट, पाकिस्तानचा संरक्षणखर्च मात्र दर-साल वाढत चाललेला होता. त्यातच अमेरिकेने पाकिस्तानला दिलेल्या प्रचंड युद्धसामग्रीची भर पडत होती. भारताचा संरक्षण-खर्च १९६२ साली चीनचे आक्रमण झाल्यावर वाढला. अजूनही भारताने आपल्या संरक्षण व लष्करी साहित्याचा वापर पाकि-स्तानविरुद्ध करण्याच्या दृष्टीने फार तयारी केली आहे असे नाही. गेल्या वर्षी पाकिस्तानशी झालेल्या सशस्त्र संघर्षात भारताने १९६० साली हातात असलेले लष्करी साहित्यच वापरले. १९६२ नंतर भारताने संरक्षक दलांना नवीन शस्त्रास्त्रे पुरविण्यास प्रारंभ केला असला तरी ह्या तयारीचा खरा रोख चीनविरोधी आहे. पाकिस्तानला त्याबाबत चिंता करण्याचे कारण नाही. अशा परिस्थितीत पाकिस्तानने केलेली संरक्षणखर्चातील कपातीची सूचना परदेशांच्या डोळ्यांत प्रचारकी धूळ टाकण्यासाठी केली आहे, असे म्हणणे भाग पडते.

## गुजरातमधील बंदरांच्या विकासाची मागणी

भारताच्या पश्चिम किनाऱ्यावर अनेक मध्यम प्रतीची बंदरे असून त्यांचा विकास करण्यात आल्यास मुंबईसारख्या मोठ्या बंदरांवर पडणारा ताण कमी होईल. सध्या या बंदरांची मालाची चढउतार करण्याची पात्रता सुप्तावस्थेत आहे. महाराष्ट्र व गुजरात राज्यांतील अशी मध्यम प्रतीची बंदरे सुधारण्याची मागणी कर-ण्यात येत आहे. गुजरात राज्य बंदर सल्लागार मंडळाची एक बैठक अहमदाबाद येथे भरली होती. बैठकीला गुजरात राज्याचे बंदरमंत्री हजर होते. बैठकीत अशी मागणी करण्यात आली की राज्यातील मध्यम प्रतीची बंदरे परदेशीय चलन मिळविण्याच्या कामी मोठी कामगिरी करत असल्यामुळे त्यांची सुधारणा कर-ण्यात यावी. मध्यवर्ती सरकारकडे ह्या कामासाठी पैशाची मागणीही करण्यात आली. बैठकीत बोलताना बंदरमंत्री श्री. त्रिवेदी म्हणाले की, गुजरात राज्यातील बंदरांत होणारी वाहतूक वाढत चाललेली आहे. १९६४-६५ च्या मानाने १९६५-६६ ह्या वर्षात बंदरांतून होणारी वाहतूक ६८,२३५ टन अधिक झालेली आहे. गेल्या वर्षी पाकिस्तानशी झालेल्या संघर्षाचा बंदरांवर थोडासा परिणाम झाला. परंतु, त्याचे स्वरूप तात्कालिक होते. मांगडाला बंदरातून होणारी वाहतूक उत्तेजक आहे. ह्या बंदरातून रशिआला पाठविण्यात आलेली केळी तेथे सुरक्षितपणे पोहोचली आहेत.ह्याच बंदरातून खते आणि अन्नधान्ये आयात करण्याची खटपट करण्यात येत आहे. पोरबंदर हे बंदर सर्व प्रकारच्या हवामानात उपयोगी असे करण्यात येणार आहे. ह्या कामासाठी ६० लाख रुपयांची तरतूद करण्यात आली आहे. प्रत्यक्ष कामास आरंभ ह्याच वर्षी करण्यात येईल. गुजरातमधील मध्यम प्रतीच्या बंदरांच्या विकासाचे काम पूर्ण होण्यासाठी बऱ्याच आनुषंगिक सुधारणा घडवून आणणे जरूर आहे.

# ठेवीदार परिषदेचे कार्य

## ( सन १९५१ ते १९६६ )

रविवार दि. २३ सप्टेंबर, १९५१ रोजी पुणे येथील ब्राह्मण कार्यालयात ठेवीदारांची प्रथम प्रकट सभा भरली. सभेस ठिकठिकाणचे १०० वर ठेवीदार उपस्थित होते. पुढीलप्रमाणे मुख्य ठराव सभेत सर्वसंमत झाला:—

" ठेवीदारांचा संघ स्थापावा. त्याचे उद्देश पुढीलप्रमाणे असावेत: (अ) नादारीत असलेल्या कंपन्यांकडून ठेवीदारांचे पैसे वसूल करणे. (ब) अशा कंपन्यांच्या डायरेक्टर व मॅनेजिंग एजंटांवर जरूर तर कायदेशीर उपाययोजना करणे. (क) ठेवी कोणत्या कंपनीत ठेवाव्या याबद्दल मार्गदर्शन करणे. (ड) ठेवीदारांच्या नुकसानीकडे सरकारचे लक्ष वेधणे व ठेवीदारांच्या हितसंरक्षणासाठी कंपनीकायद्यात दुरुस्ती सुचविणे."

कार्यकारिणीने घटना व नियम तयार केले व दि.२५-११-१९५१ रोजी अधिकृतरीत्या स्वीकारले. संस्थेचे नाव 'ठेवीदार परिषद, पुणे' असे ठरविले. याप्रमाणे ठेवीदार परिषद दि. १ जानेवारी १९५२ रोजी अधिकृतरीत्या सुरू झाली.

### ५८ कंपन्यांत बुडलेले ५½ कोटी रु.

परिषद स्थापन झाल्यावर पत्रके काढून व अन्य मार्गांनी माहिती काढून असे आढळून आले की, महाराष्ट्रात एकंदर ५८ कंपन्या बुडीत होत्या व त्यांत गरीब मध्यम वर्गाचे साडेपाच कोटी रुपये बुडालेले होते.

परिषदेची वार्षिक वर्गणी सर्व सभासदांची रु. तीन ठरली. या रीतीने जमा होणाऱ्या वर्गणीतून परिषदेचे सर्वसाधारण काम (म्हणजे कोणत्याही एका विवक्षित कंपनीसंबंधाने नव्हे) केले जात असे. याशिवाय ज्या कंपनीने ठेवींचे व्याज देणे बंद केले आहे त्याविषयी त्यांचेवर कायदेशीर इलाज करण्याकरिता त्या कंपनीच्या ठेवीदार सभासदांकडून त्यांच्या ठेवीच्या १½ टक्का रकम (पण १०० रु. पेक्षा जास्त नाही अशी) विशेष वर्गणी म्हणून घेतली जाई.

### हाती घेतलेल्या कंपन्यांची कामे

परिषदेचे १९५२ साली १२२ सभासद होते, ते पुढील वर्षी ८१ झाले आणि कमीकमी होत १९६५ साली १३ उरले.

परिषदेने खालील कंपन्यांची कामे हाती घेतली:—

असोसिएटेड शुगरकेन प्रॉडक्ट्स, बरोडा बॅटरीज, मागोरा केमिकल कंपनी, कृष्णा शुगर मिल्स, डेक्कन ॲग्रिकल्चरल इंडस्ट्रीज आणि श्रीराम सिल्क मिल्स.

याप्रमाणे हाती घेतलेली कंपन्यांसंबंधी सर्व कामे आता पूर्ण झाली आहेत. सभासदांची अत्यल्प संख्या व कार्यकर्त्यांचे वाढते वार्धक्य यांचा विचार करून परिषद बंद करण्याचा निर्णय साधारण सभेने घेतला आहे. कंपन्यांच्या कामाकरिता घेतलेल्या विशेष वर्गणीतून त्या कंपनीच्या कामाकरिता खर्च झालेली रक्कम वजा जाता राहिलेली शिल्लक त्या त्या कंपन्यांचे काम संपल्यावर वर्गणीदारांना प्रमाणशीर परत करण्यात आली आहे. साधारण वर्गणीतून राहिलेली शिल्लक साधारण सभेने दिलेल्या आदेशानुसार सर्व बिले देऊन झाल्यानंतर सामाजिक कार्य करणाऱ्या सार्वजनिक संस्थांना देण्यात येईल.

उत्तरोत्तर ठेवींचे प्रमाण पुष्कळ कमी झाले. आता तर रिझर्व बँकेने ठेवी घेणाऱ्या कंपन्यांना अट घातली आहे की, त्यांनी आपली अद्ययावत आर्थिक परिस्थिती रक्कम गुंतविणाऱ्याला सहज आकलन करता यावी असा मजकूर पत्रकात घातला पाहिजे.

### रजिस्ट्रारमार्फत अर्ज

एक सामुदायिक अर्जाचा मसुदा तयार करून त्यात कोणत्या कंपनीत किती ठेव ठेवली, व्याज, मुद्दल येणे केव्हापासून बंद झाले वगैरे माहिती भरण्यासाठी रकाने ठेवून त्या अर्जाच्या प्रती छापून घेऊन माहीत पडलेल्या सर्व पोळलेल्या ठेवीदारांना पाठवण्यात आल्या व माहिती भरून सही करून ते अर्ज परिषदेकडे मागविण्यात आले. अशा तऱ्हेने ३०४ अर्ज भरून आले. त्यांची कंपनीवार छाननी करून एका निवेदनासोबत सर्व अर्ज भारत सरकारच्या अर्थमंत्र्यांकडे पाठविले. सरकारने त्यांची दखल घेऊन ज्या प्रांतांतल्या कंपन्यांविषयी तक्रारी आल्या त्या प्रांतांतल्या रजिस्ट्रार ऑफ कंपनीज यांना त्या तक्रारीसंबंधी चौकशी करण्याचे हुकूम काढले. याचाच एक परिणाम म्हणून कृष्णा शुगर मिल्स, डेक्कन ॲग्रिकल्चरल इन्डस्ट्रीज, वगैरेंविरुद्ध लिक्विडेशन अर्ज रजिस्ट्रारकडून झाले.

### खटले लवकर निकालात निघण्यासाठी प्रयत्न

परिषद सुरू झाली त्या वेळी कंपनीसंबंधी डिस्ट्रिक्ट कोर्टाच्या कामांची अशी परिस्थिती होती की, खटले वर्षानुवर्षे पडून राहात व तेवढ्या काळात कंपनीचे असलेले असेट्स संपून जात व ठेवीदारांचे पूर्ण नुकसान होई. श्री. जहागीरदार प्रभृती शिष्टमंडळाने हायकोर्टाकडे जाऊन वरील परिस्थिती त्यांच्या नजरेला आणली. हायकोर्ट जज्जांनी परिषदेची विनंती मान्य करून डिस्ट्रिक्ट कोर्टास असे कळविले की, (१) कंपनी कायद्याखालील खटले इतर खटल्यांप्रमाणेच तीन वर्षांच्या आत संपतील अशा तऱ्हेने चालवावे. (२) दर महिन्याच्या शेवटी इतर खटल्यांची प्रगती जशी हायकोर्टाकडे कळवली जाते तशी कंपनीकायद्याखालील खटल्यांचीही कळवावी. (३) लिक्विडेटर कामास वेळ लावीत आहे असे दिसले तर त्यांना बदलावे. या पत्रकाचा परिणाम होऊन पुण्याच्या डिस्ट्रिक्ट कोर्टात कुजत पडलेल्या पंचवीस खटल्यांच्या तारखा लागल्या व परिषदेने चालू केलेल्या खटल्यांनाही चालना मिळाली. परंतु या काळानंतर कंपनीकायद्याखालील खटले डिस्ट्रिक्ट कोर्टात न चालता हायकोर्टातच चालावे अशी दुरुस्ती कंपनीकायद्यात झाल्यामुळे ठेवीदारांना कंपन्यांविरुद्ध खटले चालविणे आणखी कठीण झाले.

कोणत्याही कंपनीसंबंधी काम हाती घेण्याअगोदर त्या कंपनीचे निदान वीस ठेवीदार व त्यांच्याकडून निदान तीनशे रुपये विशेष वर्गणी जमा झाल्याशिवाय परिषद ते काम हाती घेत नसे. यामुळे काही कंपन्यांची कामे हाती घेता आली नाहीत. परंतु अशा ठेवीदारांना मार्गदर्शन करणे, कोर्टाने ठरविलेल्या गोष्टी डायरेक्टरांनी न केल्यास कोर्टापुढे तक्रार मांडणे, काही प्रसंगी वाटपाचे काम हातात घेणे, ठेवीदार व डायरेक्टर यांमध्ये समझोता करण्याचा प्रयत्न करणे, वगैरे कामे कार्यकारिणीतील सभासदांनी परिषदेच्या उद्देशानुसार केली.

श्री. वि. ग. पटवर्धन, श्री. कृ. वि. पेंडसे, प्रा. प. म. लिमये, प्रा. वि. पां. वोकील, रावसाहेब ग. वा. जोशी, श्री. आर. ए. जहागीरदार प्रभृतींनी ठेवीदार परिषदेची स्थापना व तिचे कार्य ह्यांत कळकळीने भाग घेतला.

---

## पक्का निवाडा कशाला ?

### पुराणमित्येव न साधु सर्वम्

कर्ज मंजूर करताना, सावकार व बँका या ऋणकोच्या स्थावर मिळकतीबरोबरच किंबहुना अधिक महत्त्व त्यांच्या पतीस, चारित्र्यास व परतफेडीच्या प्रामाणिकपणास देतात. तरीही पुष्कळ वेळा स्थावर मिळकती या तारण अथवा गहाण घेण्यास धनकोची उत्सुकता असते. पण केवळ स्थावर मिळकतीचे तारणावर धनको कर्ज देण्यास नाखूष असतो. गहाण मिळकती विक्री करून पैसे मिळण्यास कोर्टातून विलंब लागतो, हे त्यास सबळ कारण आहे. हा विलंब कमी करण्याचा एक मार्ग म्हणजे गहाणाचा प्राथमिक निवाडा, नंतर पक्का निवाडा, नंतर दरखास्त अशा श्रेणी कायद्याने सांगितल्या आहेत. यांपैकी पक्का निवाडा करण्याची अट रद्द केल्यास बराच वेळ व खर्च वाचेल. प्राथमिक व पक्का निवाडा करणे ही एक जुनी प्रथा पण अनावश्यक प्रथा आहे.

यांपैकी हे दोन्ही निवाडे एकत्र केल्यास अगर पक्का करण्याची जरुरी रद्द केल्यास खर्च व वेळ वाचेल. सांप्रतही तडजोडीच्या हुकूमनाम्यास कच्चा, पक्का असे दोन टप्पे करावे लागत नाहीत. शिवाय सहकारी गहाण निवाड्यास एकच निकाल दिला जातो. लँड डेव्हलपमेंट ॲक्ट व महाराष्ट्र स्टेट फायनान्शिअल ॲक्टमध्ये तर ह्या बाबीस अजिबात फाटा दिला आहे. गहाण निवाड्याबरोबर चार-सहा महिन्यांनंतर दरखास्त देण्याची बेलाशक तरतूद करावी. पक्क्या निवाड्याचे वेळी ज्या ज्या विवाद्य विषयाची, ऋणकोने वसूल दिल्याची, चौकशी होते ती सर्व चौकशी दरखास्तीचे वेळी सहज करता येण्यासारखी आहे. पक्का निवाडा हा अजागलस्तनाप्रमाणे आहे. तरी कायद्यात जरूर ती सुधारणा करून पक्का निवाडा करण्याची आवश्यकता ही रद्द केल्यास धनको, बँका, स्थावर मिळकतीचे गहाणावर पैसे देण्यास अधिक तयार होतील.

—ना. वि. भोंडे,
बी. ए., एलएल. बी., ॲडव्होकेट.

---

### न्यायाधीशांचा पगार

न्यायमूर्ती गोखले ह्यांनी आपल्या हायकोर्टाच्या जज्जाच्या जागेचा राजीनामा दिल्यापासून जज्जांच्या पगाराचा अपुरेपणा हा चर्चेचा विषय झाला आहे. भारत सरकारचे विधिमंत्री श्री. पाठक ह्यांनी ह्या प्रश्नाचे गांभीर्य मान्य केले आहे. ते स्वत: पूर्वी हायकोर्ट जज्ज होते. हायकोर्टे प्रथम स्थापन करण्यात आली तेव्हा, म्हणजे १०० वर्षांपूर्वी, जज्जाचा पगार ४,००० रुपये ठरविण्यात आला. त्या वेळी प्राप्तिकर व इतर कर जवळजवळ नव्हतेच आणि रुपया हा खरोखरच रुपया होता. १९३७ साली फेडरल कोर्टाच्या सरन्यायाधीशाचा पगार ७,००० रुपये आणि न्यायाधीशाचा पगार ५,५०० रुपये ठरविण्यात आला. १९५० सालापासून सुप्रीम कोर्टाच्या सरन्यायाधीशाला ५,००० रुपये आणि इतर न्यायाधीशांना ४,००० रुपये मिळू लागले. हायकोर्टाच्या सरन्यायाधीशाचा पगार ४,००० रुपये आणि इतर न्यायाधीशांचा ३,५०० रुपये ठरला. रुपयाची किंमत घटत जाऊन हा पगारही प्रत्यक्षात आणखी कमी झाला. इनकमटॅक्स, ॲन्युइटी डिपॉझिट, घरभाडे, विमा, प्रॉव्हिडंट फंड, इत्यादी वजा जाता हायकोर्टाच्या न्यायाधीशाच्या खिशात १,००० रुपयेच उरतात.

---


भारतातील प्रमुख नागरी सहकारी बँक!
सारस्वत
को-ऑपरेटिव्ह बँक लि.
सारस्वत बँक बिल्डिंग, गिरगांव, मुंबई ४.

| | | |
|---|---|---|
| वसूल भांडवल ... | रु. | ११·९१ लाख |
| रिझर्व्ह व इतर फंडस् ... | रु. | १६·०८ ,, |
| ठेवी ... | रु. | ४३८·०२ ,, |
| खेळते भांडवल ... | रु. | ४९०·७३ ,, |

शाखा : फोर्ट, दादर, माहीम, वरळी, वडाळा, पुणे व बेळगाव. महिला शाखा : सारस्वत बँक-गृह, निकदवरी लेन, मुंबई ४.

स्थापना १९१८



पुष्पाचे बालिश लड्ड मी कमीच पुरवले. म्हणून ती माझेवर नाखूष असे.
लग्न सोहळ्यातील थाट तिचे — लाजरेहास्य तिला खुलवीत आहे.
आळस न करता मी बँकेत पैसे का ठेवत असे ते ती आज उमजली.
— बाबा

दि युनायटेड वेस्टर्न बँक लि.
'सविनय' सेवा
सातारा

## येत्या हंगामाच्या कर्जमागणीची पूर्वतयारी
### रिझर्व्ह बँकेत बँकर्सची चर्चा व निर्णय

रिझर्व्ह बँकेचे गव्हर्नर आणि प्रमुख हिंदी व परदेशी बँकांचे चेअरमन व चीफ एक्झिक्युटिव्ह, ह्यांची सभा रिझर्व्ह बँकेत नुकतीच भरली होती. येत्या हंगामात पैशाची मागणी बरीच वाढेल, ह्याबद्दल सभेत एकमत झाले. आयातींत वाढ आणि आयात मालाच्या किमतीत अवमूल्यनामुळे वाढ, ह्यांमुळे खेळत्या भांडवलासाठी कर्जांची खूपच मागणी येईल. चालू वर्षी शेतीचे उत्पादन सुधारेल, ह्या अपेक्षेने शेतीच्या मालाच्या उठावासाठीही जास्त कर्जांची मागणी येईल, असा अंदाज आहे. उत्पादनावर प्रतिकूल परिणाम होऊ नये; त्यासाठी आवश्यक तो पैसा बँकांना रिझर्व्ह बँकेच्या प्रसंगोचित मदतीने उपलब्ध करून देता यावा; त्याचबरोबर, कारखाने जरुरीपेक्षा जास्त पैसा मालात गुंतवीत नाहीत ना, हेहि पाहायला हवे. ठेवींच्या रूपाने आलेला जादा पैसा आणि कर्जफेडीच्या द्वारा बँकांकडे जो पैसा परत आला असेल, तो त्यांनी सरकारी रोख्यात गुंतवावा, असे रिझर्व्ह बँकेच्या गव्हर्नररांनी बँकर्सना सांगितले. म्हणजे, मोसमाच्या वेळी ह्या पैसा तरत्या स्वरूपात उपलब्ध होऊ शकेल. मोसमात अवलंबिण्याच्या धोरणाची चर्चा पुढे करावी, असे ठरले. बँकांना उपलब्ध होणारा पैसा त्यांनी कारखान्यांना आणि आयात–निर्गत व्यापाराला पुरवावा, असे त्यांना आवाहन करण्यात आले. अग्रस्थान दिलेल्या क्षेत्रांना देण्यास बँकांना पैसा अपुरा पडला, तर रिझर्व्ह बँक रीफायनॅन्सच्या धोरणाप्रमाणे बँक रेटने तो पुरवील. परंतु, अग्रस्थान नसलेल्या क्षेत्राला कर्जपुरवठा केल्यामुळे बँकांना पैसा अपुरा पडला आणि रिझर्व्ह बँकेकडे त्यांनी कर्ज मागितले, तर ते दंडादाखल व्याजाच्या दराने दिले जाईल. स्वतःचे पैसे शक्य तो सांभाळून राखण्याचे बँकांनी मान्य केले.

---

### विद्यापीठे आणि उद्योगधंदे ह्यांतील बुद्धिवंतांचा सरकारात समावेश हवा

"आपण आपल्या मिळकतीच्या मानाने फार उधळपट्टी करीत आलो आहो. ह्यापुढे तरी आपण बुद्धिपुरःसर परदेशी मदत कमी कमी घेत गेले पाहिजे; परावलंबन नष्ट केले पाहिजे" असे उद्‌गार माजी अर्थमंत्री श्री. चिंतामणराव देशमुख ह्यांनी अवमूल्यनासंबंधी बोलताना एका भाषणात काढले. असे केले, म्हणजे आपण आपोआपच स्वतःच्या चुकांकडे अधिक लक्ष देण्यास उद्युक्त होऊ. सरकारजवळ जरूर तेवढी पात्रताच नाही; विद्यापीठे, उद्योगधंदे आणि इतर क्षेत्रे ह्यांतील बुद्धिवंतांचा सरकारने आपल्या कारभाऱ्यांत समावेश करायला हवा; मध्यवर्ती आणि राज्यसरकारांत स्वतःच्या भोवतालच्या अगदी लहान वर्तुळातील लोकांचीच वर्णी लावली जाते, हे राष्ट्रहिताचे नाही.

---

### दोनच मुले होऊ देण्याची शपथ

"स्वतःला दोनपेक्षा जास्त अपत्ये होऊ न देण्याची स्त्रियांनी शपथ घेतली पाहिजे; बिकट अन्नपरिस्थिती आणि लोकसंख्येची भरमसाठ वाढ ही लक्षांत घेता अशी शपथ आवश्यकच आहे," असे ऑल इंडिया वुमेन्स कॉन्फरन्सच्या अध्यक्ष, श्री. मिराबेन झाबवाला, ह्यांनी कॉन्फरन्सच्या स्टँडिंग कमिटीच्या अकोला येथील सभेत सांगितले.

---

### बुटपॉलिशवाला कोट्यधीश झाला

आठ वर्षांपूर्वी मुंबईच्या फुटपाथवर झोपणारा जे. जोसेफ हा बुटपॉलिशवाला आता कोट्यधीश आहे. २७ लक्ष रुपये किमतीचे सोने चोरटेपणाने आणल्याच्या आरोपावरून त्याला कोर्टापुढे उभे करण्यात आले आणि कोर्टाने त्याला २ लक्ष रुपयांच्या जामिनावर सोडले. त्याला अटक करण्यात आली, त्याच्या आधीच्या चार महिन्यांत त्याने १·५ कोटी रुपयांचे सोने अशा रीतीने भारतात आणले, अशी माहिती कोर्टात सांगण्यात आली. कुलाब्याला फॅशनेबल वस्तीत त्याच्या मालकीचा प्रशस्त फ्लॅट असून त्याची मालमत्ता २ कोटी रुपयांची आहे.

---

### कॅनरा बँकेचा सुवर्णमहोत्सव

कॅनरा बँक लि. चा सुवर्णमहोत्सव शुक्रवार, दि. १ जुलै रोजी सुरू झाला. ह्या बँकेकडे ३१ डिसेंबर, १९६५ अखेरच्या ताळेबंदाप्रमाणे ९८ कोटी रु. च्या ठेवी असून तिचे खेळते भांडवल ११० कोटी रु. आहे. आता तिच्या २४० शाखा आहेत आणि तिच्याकडील नोकरवर्ग ५,००० आहे. गेल्या काही वर्षांत तिने खूपच प्रगती केली आहे. लक्ष्मी बँक आणि पलई सेंट्रल बँक बुडाल्यानंतर दक्षिण भारतातील कित्येक लहान बँका संकटात आल्या; लोकांत घबराट पसरली. कॅनरा बँकेने नऊ बँका विलीन करून घेतल्या. त्यांपैकी पंड्यन बँकेच्या ८३ शाखा होत्या व तिचेकडे ८०० नोकर होते. गेल्या दहा वर्षांतील सर्व विलिनीकरणात हेच मोठे विलिनीकरण होते.

---

### बँककडे आलेल्या पार्सलात नोटांऐवजी दगड

इंडियन बँक लि. च्या अनंतपूर शाखेने २३ जून रोजी मद्रासच्या मुख्य कचेरीला प्रत्येकी १० हजार रु. च्या नोटा असलेली दोन रजिस्टर्ड पोस्ट पार्सले पाठविली. ती उघडण्यात आली, तेव्हा दोन्हींतहि नोटांचे ऐवजी तेवढ्याच वजनाचे दगड आढळले. पोलीस तपास मद्रास आणि अनंतपूर, दोन्ही ठिकाणी चालू आहे.

---

### "वेताच्या छड्या जपानी नकोत"

इंग्लंडमधील सुप्रसिद्ध ईटन पब्लिक स्कूलमधल्या विद्यार्थ्यांनी शाळेच्या अधिकाऱ्यांकडे पुनः अर्ज करून, "वर्गात वापरण्यात येणाऱ्या वेताच्या छड्या जपानी नसाव्यात, त्या इंग्लंडमधीलच असाव्यात," अशी विनंती केली आहे.

---

### १० लाखांवर मुलांना व स्त्रियांना दुष्काळाचा तडाखा

भारताच्या नियोजन समितीने, दुष्काळाने ग्रासलेल्या राज्यांतील परिस्थितीची पाहणी केली. ह्या पाहणीच्या वेळी सरकारच्या अन्न, अर्थ आणि आरोग्यखात्याचे प्रतिनिधीही समितीच्या प्रतिनिधींबरोबर गेले होते. आंध्र प्रदेश, गुजरात, मध्य प्रदेश, महाराष्ट्र, म्हैसूर, ओरिसा आणि राजस्थान ह्या राज्यांतील मिळून ११४ जिल्ह्यांना अवर्षणाचा तडाखा विशेष जोराने बसल्याचे आढळून आले. ह्या जिल्ह्यांतील १० लाखांवर मुले, गर्भवती व लेकुरवाळ्या स्त्रिया ह्यांना दुष्काळामुळे पुरेसे अन्न मिळत नाही. ह्या परिस्थितीवर त्वरेने उपाययोजना करण्यात आली नाही, तर देशांतील अनेक भागांतील अन्नाची टंचाई अधिकच भडकेल असा संभव आहे. दुष्काळ व अन्नटंचाई ह्यांच्या मागोमाग रोगराई पसरते असा अनुभव असल्याने आरोग्यरक्षणाचे उपायही तातडीने योजण्याची आवश्यकता पाहणीत दिसून आली.

## वैश्य को-ऑपरेटिव्ह बँक लि.

स्थापना : १९४५ ] ७, मुगभाट रस्ता, मुंबई-४. [ टेलिफोन ३५६५०२


( १ ) वचत खाते :—व्याजाचा दर : द. सा. द. शे. रु. ४=००

( २ ) महाराष्ट्र राज्यातील प्रमुख गावांवर डिमांड ड्राफ्ट उपलब्ध

( ३ ) खास बचत योजना :—घरी बसून खात्यात पैसे भरता येतात.

*अधिक तपशिलासाठी लिहा अथवा भेटा.*

मॅनेजर—ना. शं. कानिटकर


हे पत्र पुणे पेठ शिवाजीनगर घ. नं. ९१५/१ आर्यभूषण छापखान्यात या वृत्तपत्राचे मालक श्री. श्रीपाद वामन काळे यांनी छापिले व 'दुर्गाधिवास' ८२३ शिवाजीनगर (पो. ऑ. डेक्कन जिमखाना), पुणे ४, येथे प्रसिद्ध केले.